# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ६ जून, २०२२

---

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवार दि. ६ जून रोजी शिवस्वराज्य दिनानिमित्त मोठ्या उत्साहात शिवज्योत रॅली काढण्यात आली.

विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग यांच्या पुढाकाराने आयोजित या शिवज्योत रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहात सहभाग घेवून छत्रपती शिवरायांच्या घोषणांनी विद्यापीठाचा परिसर दणाणून सोडला. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते शिवज्योत प्रज्वलित करण्यात आली. या रॅलीचे विसर्जन मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ झाले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते शिवप्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. रा.से.यो.चे संचालक प्रा. सचिन नांद्रे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागील भुमिका स्पष्ट केली. अक्षय महाजन या विद्यार्थ्याने पोवाडा सादर केला. प्रा.दीपक सोनवणे यांनी महाराष्ट्र गीत सादर केले. डॉ. नितीन बडगुजर यांनी आभार मानले. यावेळी प्रा.एस.टी. इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. के.एफ. पवार, प्रा. ए.एम. महाजन, सहसंचालक कार्यालयातील के.बी. दांडगे, जी.आर. वळवी तसेच सहायक कुलसचिव एन.जी. पाटील, विलास पाटील, कैलास औटी, रमेश पाटील, मच्छींद्र पाटील, अरूण सपकाळे, भिमराव तायडे, डॉ. विजय घोरपडे, संजय चव्हाण, नरेंद्र पाटील, चंद्रकांत पाटील, रवींद्र पाटील, सचिन पाटील, आकाश भामरे, अनुराग महाजन, विजय बिऱ्हाडे, गंजीधर पाटील आदी उपस्थित होते.

## प्रा. प्रतिभा अहिरे यांचे व्याख्यान

शिवस्वराज्य दिनानिमित्त विचारधारा प्रशाळेअंतर्गत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज अध्ययन आणि संशोधन केंद्राच्या वतीने प्रा. प्रतिभा अहिरे यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्त्री – पुरूष समता विषयक दृष्टीकोन' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे होते. शिवरायांनी स्त्रियांशी समता आणि सन्मानाने वर्तन केले पाहिजे असा दंडक आपल्या स्वराज्यात घातला होता. शिवरायांचा हा दृष्टीकोन समाजात कृतीच्या पातळीवर रूजविणे आवश्यक असल्याचे प्रा. अहिरे म्हणाल्या. प्रा. इंगळे यांनी स्त्री समता विषयक मूल्यांची पायाभरणी शिवरायांनी १६व्या शतकात केली होती असे मत मांडले. यावेळी प्रभारी कुलसचिव प्रा. के.एफ. पवार, विभागप्रमुख प्रा. अजय पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा. अनिल डोंगरे उपस्थित होते. डॉ. विजय घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. जगतराव धनगर यांनी परिचय करून दिला. डॉ. दीपक सोनवणे यांनी आभार मानले.

## बातमी -२

जळगाव दि.६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आर्थिक दुर्बल घटक योजनेअंतर्गत पदवीस्तरावरील १२५८ आणि पदव्युत्तर स्तरावरील ५३६ विद्यार्थ्यांना एकूण ९१ लाख ८३ हजार रूपयांचे अर्थसहाय्य अनुदान वाटप करण्यात आले.

दरवर्षी विद्यार्थी विकास कक्षाद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास, सांस्कृतिक व कल्याण कार्यक्रमांची आखणी तसेच अर्थसहाय्य दिले जाते. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दोन वर्षापासून अर्थसहाय्य अनुदान वाटप करता आले नाही. आता फेब्रुवारी, २०२२ पासुन ऑफलाईन वर्ग सुरु झाल्याने विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले. विद्यार्थी कक्ष समितीच्या बैठकीत प्राप्त अर्जांची छाननी करण्यात येवून पदवीस्तरावरील १२५८ व पदव्युत्तर स्तरावरील ५३६

...२

विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याची शिफारस समितीने केली. पदवीस्तरावरील कला, वाणिज्य व विधी शाखेतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन हजार, बी.एस्सी., बी.बी.एम., बी.सी.ए., बी.एस.डब्ल्यु. व शिक्षणशास्त्र पदवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन हजार पाचशे रूपये, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार तसेच कला, वाणिज्यच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रत्येकी चार हजार, विज्ञान व तंत्रज्ञानच्या विद्यार्थ्यांना पाच हजार पाचशे रूपये, शिक्षणशास्त्रच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार अनुदान दिले जाते. जे विद्यार्थी दिव्यांग आहेत अथवा ज्या विद्यार्थ्यांचे आई किंवा वडील मयत आहेत त्यांना अतिरिक्त तीन हजार अनुदान दिले जाते. पदवीस्तरावरील ५५९ आणि पदव्युत्तर स्तरावरील २४२ विद्यार्थ्यांना या अतिरिक्त अर्थ सहाय्य अनुदानाचा लाभ देण्यात आला.

विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी, प्रा. एस.आर. चौधरी, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. रत्नमाला बेंद्रे, प्रा. एच.एल. तिडके, प्रा. अजय पाटील, डॉ. उज्वल पाटील, डॉ. पवन पाटील, डॉ. संजीव पाटील हे समितीच्या बैठकीला उपस्थित होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्याचा लाभ झाला. प्रा. सुनील कुलकर्णी यांच्यासह सहायक कुलसचिव एन.जी. पाटील, मच्छींद्र पाटील, संतोष माळी, जगदीश शिवदे, अनुराग महाजन, विलास माळी, चंदन मोरे यांनी परीश्रम घेतले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी